Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

18th Feb. 2019 Special Issue- 130 (I)

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor**
**Dr. Dhanraj T. Dhangar**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
**Dr. Vanmala Govindrao Gundre**
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Co-Editor**
Dr. Ahilya Barure
Dr. D.R. Tandale
Dr. D.B. Tanduljekar

RESEARCH JOURNEY

(2) Dr. Shivaji Diwan
(Pol. Sci.)

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
Vol. (I)
18 Feb. 2019 Special Issue- 130

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Dr. Vanmala Govindrao Gundre**
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Co-Editor**
**Dr. Ahilya Barure**
**Dr. D.R. Tandale**
**Dr. D.B. Tanduljekar**

**RESEARCH JOURNEY** International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) -0.676 Special Issue – 130 (I) | January 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

19. स्त्रियांचे प्रश्न आणि मानवी हक्क — 65
**प्रा.डॉ. देशमुख रुपेश नानासाहेब**

20. मानवी अधिकार आणि भारतीय राज्यघटना — 68
**प्रा.डॉ. दिवाण शिवाजी गोविंदराव**

21. भारतातील मागासवर्ग आणि मानवी हक्क — 70
**प्रा.डॉ.बी.एम.नरवाडे**

22. मानवी हक्क आणि महिला — 73
**डॉ.मेघा एस. पाठक (दिग्रसकर)**

23. मुलभूत हक्कातील शिक्षण: एक दृष्टीक्षेप — 75
**प्रा.डॉ.रुद्देवाड बी.पी.**

24. मानवाधिकार आणि बालविकासाच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास — 77
**प्रा.अनिल गाडेकर**

25. मानवी हक्क आणि महिला विकास — 79
**आबासाहेब आर.कसबे**

26. मानवाधिकार आणि स्त्रियांची स्थिती — 81
**प्रा. सुरेंद्र हरिभाऊ किन्हीकर**

27. मानवी अधिकारांचे प्रकार — 84
**प्रा. आर.डी.खताळ**

28. महाराष्ट्रातील मानव अधिकार : विशेष संदर्भ रोजगार व दारिद्र्य — 86
**प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख**

29. भारतीय राज्यघटनेतील मानवी हक्क — 90
**डॉ. प्रशांत भाऊसाहेब सोळंके**

30. भारतीय संविधान आणि मानव अधिकार — 92
**प्रा. राजाराम नामदेव निगडे**

31. मानवी हक्क आणि महिला सक्षमीकरण — 94
**डॉ.दीपक एम.भारती , मेघराज जनार्धन मोरे**

32. भारतीय राज्यघटना व मानवाधिकार — 97
**डॉ.आरडले एस.डी.**

33. भारतातील दलित चळवळ आणि मानवी हक्क विषयक तरतुदी — 99
प्रा.डॉ अजय पाटील

34. भारतातील बालकामगार विषयक समस्या व कायदे — 102
प्रा.डॉ किशोर गटकळ

35. स्त्री हिंसाचार : एक आव्हाण — 105
प्रा. सय्यद आर. आर.

36. मानवी हक्क व महिला — 107
प्रा. संध्या पेंडकर / देशपांडे

37. मानवी हक्क आणि भारतीय महिला. — 111

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (I) | January 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

# मानवी अधिकार आणि भारतीय राज्यघटना

**प्रा.डॉ. दिवाण शिवाजी गोविंदराव**
राज्यशास्त्र विभाग, महिला कला महाविद्यालय, गेवराई , ता. गेवराई जि.बीड

---

**प्रस्तावना :-**

स्वतःचे जीवन उत्तम प्रकारे व्यतीत करण्यासाठी आपणास किंवा मानवास दिलेल्या अधिकारास ‘हक्क’ असे म्हणतात. मानवाचे जीवन खऱ्या अर्थाने विकसित करायचे असेल तर हक्क ही अशी मुलभूत आवश्यकता आहे की ज्यास राज्याकडून मान्यता मिळाली आहे.

मानवाधिकार हे व्यक्तीच्या प्रतिष्ठेशी संबंधित आहेत. त्यातून व्यक्तिगत अस्तित्वाची प्राप्ती करणे आणि मानवी समाजाचा विकास करणें हे मानवाधिकारातून साध्य होते. भारतीय राज्यघटनेने व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी मुलभूत अधिकारांचा उल्लेख केला आहे. भारताने सार्वभौम लोकशाही गणराज्य निर्माण करण्याचे उद्दिष्ट स्वीकारले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, आपल्याला देशात अशा समाजाची निर्मिती करायची आहे की, ज्यामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात एक व्यक्ती एक मूल्य प्रस्थापित करता येईल आणि समतेचे तत्व स्थापित होईल.

भारतीय इतिहास पहाता असे दिसते की, भारतातील जाती व्यवस्थेमुळे भारतीय जनसमाजातील काही समाजाला त्यांचे हक्क मिळाले नव्हते. म्हणून या भारतीय समाजात एक गटच विकासापासून दूर केलेला गेलेला होता. मुलभूत नैसर्गिक अधिकारच त्यावेळेस मानवाला मिळत नव्हते. त्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेला आकार दिला.

**मानवाधिकारांची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

**1) पहिला कालखंड :-**

जैन व बौध्द धर्म, रामायण, महाभारत, कौटिल्याचे अर्थशास्त्र, वेदिक धर्म यामध्ये मानवाधिकारांचा उल्लेख आढळतो व त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था केल्याचे दिसून येते. प्रसिध्द चिनी तत्वेवला कन्फ्युशिपस यांचा लिखानातही मानवी हक्काचा उल्लेख आढळतो. ग्रीक राज्यकर्त्यांने जनतेलाकाही मानवी हक्क दिले होते.

**2) द्वितीय कालखंड :-**

यामध्ये थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, जे.जे. रुसो यांचा समावेश होतो. या टप्प्यामध्ये करारवाद्यांचे महत्वाचे योगदान आहे. कार्ल मार्क्स या जर्मन विचारवंतांने मानवाच्या आर्थिक अधिकाराचा पुरस्कार केला आहे.

**3) तिसरा कालखंड :-**

1225 मध्ये इंग्लंडमध्ये मानवी हक्कासाठी चळवळ झाली. त्यातुन मॅग्नाचाटी करार झाला व इंग्लंडच्या राजाला स्वतःच्या अमर्याद हक्कावर मर्यादा स्वीकाराव्या लागल्या. 1689 चा पिटिशन ऑफ राईट्स आणि 1689 मधील बिल ऑफ राईट्स या तिन्ही कायद्यामुळे ब्रिटनमधील राजाची सत्ता अमर्यादित करण्यात आली व व्यक्तींना स्वातंत्र्य बहाल करण्यात आले.

1776 मध्ये अमेरिकेच्या लोकांनी इंग्लंडचे वर्चस्व झुगारून स्वातंत्र्याचा जाहीरनामा घोषित केला. 1791 मध्ये अमेरिकन जनतेला मुलभूत अधिकार प्रदान करण्यात आले. 1789 मध्ये फ्रान्समध्ये मानवाच्या मूलभूत हक्कांच्या जाहिरनामा घोषित करून त्यांनी समतेसाठी क्रांती केली व अनियंत्रीत राजसत्ता अनैतिक असल्याचा संदेश जगाला दिला.

1917 च्या रशियन साम्यवादी क्रांतीमुळे तेथील जनतेला 1933 मध्ये मुलभू तत्वांचा स्वीकार केला. 1945 च्या संयुक्त राष्ट्रसंघटनेने मानवाधिकाराची सनद जाहीर करून जगातील मानवांचे विविध बंधनातून मुक्त करण्याचे जाहीर आवाहन केले.

**मानवी हक्काचा अर्थ व व्याख्या :-**

1) **प्रा. एच.के. लास्की :-** हक्क म्हणजे सामाजिक जीवनाशी अशी परिस्थिती होय की ज्याशिवाय व्यक्तीला सामान्यतः स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही.

2) **टी.एच. ग्रीन :-** यांच्या मते मानवाच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असलेली बाह्य परिस्थिती म्हणजे हक्क होय.

3) **प्रा. बोझाके :-** आपण ज्या समाजाचे घटक असतो. त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होय.

4) **रॅन्डमहाउस विश्वकोष :-** मानवाधिकार म्हणजे व्यक्तीच्या जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असतात.

**मानवी अधिकार आणि भारतीय राज्यघटना :-**

भारतीय राज्यघटनेत हे मानवी हक्क खालील तीन भागामध्ये दिसून येतात.

**अ) राज्यघटनेची उद्देशपत्रिका :-**

राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत मुलभूत मानव अधिकारांना स्थान देण्यात आले आहे. भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक, कायद्यासमोर समानता विचार, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मिळेल असे उद्देशपत्र नमूद करण्यात आले आहे. तसेच लोकांना विश्वास, श्रध्दा उपासनेचे स्वातंत्र्य असेल असे या उद्देशपत्रिकेतून भारतीय घटनाकारांच्या मुलभूत मानव अधिकाराविषयीच्या व्यापक दृष्टीकोनाची कल्पना येते.

**ब) मुलभूत हक्क आणि मानव अधिकार :-**

1) **समानतेचा अधिकार :-**

अ) कायद्यापुढे समानता (कलम 14)

ब) धर्म, वंश, जात, जन्मस्थान लिंग सरकार भेदभाव करणार नाही.
क) सरकारच्या अख्यारीत नोकरीसाठी भेदभाव नाही. (कलम 16)
ड) अस्पृश्यता नष्ट करण्यात आली. अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा आहे. (कलम 17)
ई) लष्करी आणि शिक्षणविषय क कोणताही किताब राज्याकडून प्रदान केला जाणार नाही (कलम 18)

**2) स्वातंत्र्याचा अधिकार :-**

भारतीय राज्यघटनेचा 19 ते 22 या कलमात स्वातंत्र्याचा अधिकार स्पष्ट करण्यात आला आहे. कलम 19 मध्ये भारतीय नागरिकांना स्वातंत्र्याचे सहा अधिकार देण्यात आले आहेत.

या अधिकाराच्या संरक्षणासाठी कलम 20, 21, 22 मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

अ) कलम 20 नुसार एकाच अपराधासाठी व्यक्तीवर एकापेक्षा अधिकवेळा खटला भरता येणार नाही आणि व्यक्तीला स्वतः विरूध्द साक्ष देण्यासाठी सक्ती केली जाणार नाही.
ब) कलम 21 नुसार कायद्याने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीखेरीज कोणत्याही व्यक्तीचे जिवीत आणि वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही.
क) कलम 22 नुसार एखाद्या व्यक्तीला अटक झाल्यास अटकेची कारणे त्या व्यक्तीला कळाली पाहिजेत, त्या व्यक्तीला स्वतःचा बचाव करण्याचा किंवा वकिलाचा सल्ला घेण्याचा अधिकार तसेच अटक झाल्यानंतर 24 तासाच्या आत दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले पाहिजे.

**3) शोषणाविरुध्दचा अधिकार :-**

राज्यघटनेच्या कलम 23 व 24 मध्ये शोषणाविरूध्दचा अधिकार देण्यात आलेला आहे. यात प्रामुख्याने

अ) कलम 23 नुसार माणासाची विक्री आणि पेठ बिगारी यांना मनाई आहे.
ब) कलम 24 नुसार 14 वर्षाखालील कोणत्याही बालकाला कारखान्यात किंवा खाणीत काम करण्यास ठेवले जाणार नाही.

**4) धर्म स्वातंत्र्याचा अधिकार :-**

अ) आपल्या धर्माचे पालन व प्रसार करता येतो (कलम 25)
ब) धार्मिक संस्था स्थापन करण्याचा त्याचा कारभार चालविण्याचा अधिकार (कलम 26)
क) धार्मिक संप्रदायाच्या प्रसारासाठी सक्तीने कर वसूल करता येणार नाही.
ड) धार्मिक शिक्षणाबाबतच्या स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 28)

**5) सांस्कृतिक शैक्षणिक अधिकार :-**

अ) कलम 29 नुसार भारतातील प्रत्येक नागरिकाला स्वतःची भाषा, लिपी, संस्कृतीचे जतन करण्याचा अधिकार राहील.
ब) कलम 30 नुसार धार्मिक आणि भाषीक अल्पसंख्याक समुदायाला शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा अधिकार राहील.

**6) घटनात्मक उपाययोजनेचा हक्क :-**

या हक्कामध्ये पाच न्यायलेखांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार सर्वोच्च व उच्च न्यायालयात दाद मागण्याचा हक्क व्यक्तीला आहे. या न्यायालयाला पुढील पाच प्रकारचे आदेश किंवा न्यायालेख काढता येतात. त्यामध्ये

अ) बंदी प्रत्यक्षीकरण, ब) परमादेश, क) प्रतिषेध, ड) अधिकार पृच्छा, ई) उत्प्रेक्षण

**क) राज्याचे मार्गदर्शक तत्वे :-**

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या विभागामध्ये राज्याच्या मार्गदर्शक तत्वाचा समावेश करण्यात आलेला आहे. कलम 36 ते 51 या कलमादरम्यान राज्याला दिशा निर्देश देण्याचे कार्य राज्यघटनेने केले आहे. कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी या तत्वाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. सत्येचे विकेंद्रीकरण, समाजवादी समाजरचना निर्माण करून प्रत्येक क्षेत्रामध्ये समानता प्रस्थापित होऊ शकते. डॉ.आंबेडकरांनी मार्गदर्शक तत्वाला भारतीय राज्यघटनेचा आत्मा म्हटले आहे.

**समारोप :-**

भारतीय राज्यघटनेतील मानवी आणि मुलभूत अधिकारांचा संपूर्ण आढावा घेतल्यास आढळून येते की, भारतीय व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी व लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी हे अधिकार आवश्यकच आहेत. मानवी हक्क ही संकल्पना सातत्याने विकास पावणारी संकल्पना आहे.

मानवी अधिकारांबाबत सर्वसामान्य नागरीक स्वयंसेवी संस्था, खाजगी चळवळी कार्य करतांना दिसतात. थोडक्यात भारतीय राज्यघटनेने मानवाधिकाराला राष्ट्रीय तत्वज्ञानाला आधार देवून व्यक्तीला त्याचे न्याय अधिकार व हक्क प्रदान करून तरतूदीला घटनात्मक अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे.

**संदर्भ**

1) भारतीय राज्यघटना आणि व्यवहार - डॉ. वी.मा. बाचल, के. सागर प्रकाश, पुणे.
2) मानवी हक्क (निराली प्रकाशन, पुणे) - प्रा. नंदकुमार भारंबे
3) मानवी हक्क - प्रा. व्ही.बी. पाटील
4) भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया - जाधव तुकाराम, महेश शिरापूरकर, युनिक ॲकडमी पुणे.
5) कायदा आणि माणूस - नरजेंद्र चपळगावकर
6) भारतीय संविधान शासन व राजकारण - डॉ. प.ल. जोशी
7) भारतीय शासन पध्दती - श्रीकृष्ण गणेश नामनकर, विश्वभारती प्रकाशन, नागपूर 1972

Sawant K.D.
Lecturer in History
Mahila College, Georai.